# सहसंचालक,, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

**दुरध्वनी क्र.** 0712-2557266/46 **कार्यासन दु. क्र.** 0712-2557266

**E-mail :** ronagpur@dtemaharashtra.gov.in **Website:** rdtenagpur.org.in


**<u>अतितात्काळ</u>**

**क्र.तशिस/विकाना/शैवि-1/माहिती/2019/** 1126

**दिनांक:-** 29 MAR 2019

प्रति,

प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय, विद्यापीठ संचालित, अनुदानित व विनाअनुदानित
पदवी, पदव्युत्तर पदवी संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

विषय:- व्यावसायित अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्थांचे शैक्षणिक वर्ष 2019-20 च्या केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेकरीता नोंदणी प्रक्रियेसाठी हमिपत्र सादर करण्याबाबत.

संदर्भ:- तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मंबई यांचे पत्र क्र. २अ/एडीएम/2019/263, दि. 28/3/2019

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, राज्यातील सर्व शासकीय, विद्यापीठ संचालित, अनुदानित व विनाअनुदानित पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया मा.आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्यामार्फत एक खिडकी पध्दतीने राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने प्रवेश नियामक प्राधिकारी, मुंबई यांच्या कार्यालयात दि. 20/02/2019 रोजी झालेल्या बैठकीत शै. वर्ष 2019-20 मध्ये सर्व शासकीय, विद्यापीठ संचालित, अनुदानित व विनाअनुदानित पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया राबवितांना शासनाने वेळोवेळी प्रसिध्द केलेले नियम आपणास मान्य राहतील याबाबतचे हमीपत्र प्रवेश नियामक प्राधिकारी, मुंबई यांचेकडे सादर करावयाचे आहे.

**वरील बाब विचारात घेऊन आपणास कळविण्यात येते की, सोबत जोडलेल्या हमिपत्राच्या नमुन्यात आपल्या संस्थेचे हमिपत्र या कार्यालयाकडे दि. 04/04/2019 रोजी दुपारी 2.00 वाजेपर्यंत या कार्यालयाकडे ईमेलव्दारे ( ronagpur@dtemaharashtra.gov.in )व प्रत्यक्ष सादर करावे. जी संस्था विहीत मुदतीत हमिपत्र सादर करणार नाही त्यांचा शै. वर्ष 2019-20 च्या प्रवेश प्रक्रियेत सहभाग होणार नाही याबाबत नोंद घ्यावी.**

सहपत्र:- संदर्भिय पत्र व हमिपत्र नमुना

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक
तंत्रशिक्षण वि.का., नागपूर

C:\Meshram Degree\Letters\Letter to All Institute.doc

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

E-mail : desk2a@dtemaharashtra.org.in Internet :http/www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक : २अ/एडीएम/२०१९/२६३

दिनांक : 28 MAR 2019

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई/ पुणे /नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर

**विषय : व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्थांचे शैक्षणिक वर्ष २०१९-२० च्या केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेकरीता नोंदणी प्रक्रियेबाबत..**

संदर्भ : प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दि.२०/०२/२०१९ रोजी आयोजित केलेल्या बैठकीचे इतिवृत्तातील मुद्दा क्र.७

महाराष्ट्र विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ नुसार राज्यातील खाजगी व्यावसायिक संस्थेतील तांत्रिक अभ्यासक्रमांचे प्रवेश शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांच्यामार्फत करण्यात येत आहेत. तसेच शासकीय व शासन अनुदानीत व्यावसायिक शैक्षणिक संस्थामधील प्रवेश देखील शासन निर्णय क्र.टिईएम-२०१६/प्र.क्र.५३६/तांशि-४, दि.१५/०३/२०१६ अन्वये शासन निर्णयात नमूद तरतूदीनुसार मा.आयुक्त, रांज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्यामार्फत करण्याचे घोषित केलेले आहे. त्यानुसार राज्यातील सर्व पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया मा.आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्यामार्फत एक खिडकी पध्दतीने राबविण्यात येत आहे.

वरील बाब विचारात घेऊन प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांच्या कार्यालयात दि.२०/०२/२०१९ रोजी झालेल्या बैठकीत शै.वर्ष २०१९-२० मध्ये सर्व शासकीय व शासन अनुदानित संस्थेतील पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया राबवितांना शासनाने वेळोवेळी प्रसिध्द केलेले नियम त्यांना मान्य राहतील याबाबतचे हमीपत्र मा.सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांना सादर करणेबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे.

तरी वरील बाब विचारात घेऊन आपल्या विभागातील पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या सर्व शासकीय/ शासन अनुदानित / विद्यापीठ विभाग/ विद्यापीठ संचलित /स्वायत्त संस्थाकडून सोबत जोडलेल्या नमुन्यात हमीपत्र घेण्यात यावे व संकलीत करून एकत्रितरित्या या कार्यालयास दि.०५/०४/२०१९ पर्यंत सादर करण्यात यावे.

(डॉ.अभय वाघ)

संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई

2080

2-9-MAR-2019

C:\Users\desk2a\Desktop\Letter 2018-19.docx

## शासकीय/ शासन अनुदानित / विद्यापीठ विभाग/ विद्यापीठ संचलित/ स्वायत्त संस्थांच्या प्राचार्य/ संचालकांनी दयावयाचे हमीपत्र

मी ................................................... प्राचार्य / संचालक, (संस्थेचे नांव व कोड) या संस्थेचा व संस्थेतील अभ्यासक्रमांचा शैक्षणिक वर्ष २०१९-२० च्या केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये समावेश करण्याबाबत खालीलप्रमाणे हमीपत्र सादर करीत आहे.

महाराष्ट्र विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील तरतुदी व प्रवेश प्रक्रियेच्या अनुषंगाने शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या व भविष्यात निर्गमित होणाऱ्या शासन निर्णयातील सर्व नियमांचे व सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात येईल. मा.आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्यामार्फत शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता राबविण्यात येणाऱ्या प्रवेश प्रक्रिये संदर्भात (संस्थेतील प्रवेशाच्या अनुषंगाने) त्यांचेकडून देण्यात येणाऱ्या सर्व सूचनांचे पालन या कार्यालयाकडून केले जाईल याची मी संस्थेच्यावतीने हमी देतो.

प्राचार्य/ संचालक
(नांव व संस्थेचे सील)

ठिकाण :
दिनांक :

\\192.168.1.9\Desk2a\Hamipatra.doc